# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.३ (प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रासेयो विभागाच्या वतीने सुरु असलेल्या सृष्टी संवर्धन शिबिरात बुधवार दि. ३ जुलै रोजी वृक्ष दिंडी काढण्यात येवून वृक्षारोपण करण्यात आले.

विद्यापीठात ७ जुलै पर्यंत हे उन्हाळी शिबिर सुरु आहे. बुधवारी सकाळी विद्यार्थी भवनापासून रा.से.यो.च्या स्वयंसेवकांनी उत्साहात दिंडी काढली. यावेळी विद्यार्थ्यांनी भजन तसेच वृक्ष संवर्धन गीत सादर केले. कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी आणि शैलेजा माहेश्वरी हे वृक्षदिंडीत अग्रभागी होते. कुलगुरू प्रा.माहेश्वरी यांचा बुधवारी वाढदिवस असल्याने ६१ झाडे लावण्यात आली. यामध्ये सीताफळ, रामफळ आदी वृक्षांचा समावेश आहे. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे , कुलसचिव डॉ. विनोद पाटील, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे, अधिसभा सदस्य स्वप्नाली काळे, ऋषिकेश चित्तम, प्रा. राजु आमले, रा.से.यो. चे जिल्हा समनव्यक डॉ. दिनेश पाटील, प्रा. मनीष करंजे, प्रा. शिंगने, उद्यान अधिक्षक अश्विनी पाटील आदी उपस्थित होते.

दरम्यान या शिबिरात मंगळवारी प्रा. प्रवीण पुराणिक यांनी संशोधनाच्या वाटा या विषयावर मार्गदर्शन केले. विकास तळेले अध्यक्षस्थानी होते. विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी करीअरच्या वाटा यावर संवाद साधला. प्रा. विश्वास भामरे अध्यक्षस्थानी होते. बुधवारी दुपारच्या सत्रात अमरावती येथील निशिकांत काळे यांनी ग्रीन एनर्जी या विषयावर तर डॉ. अनील भोकरे यांनी सेंद्रीय शेती यावर मार्गदर्शन केले. या दोन्ही सत्राच्या अध्यक्षस्थानी ज्ञानस्त्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. विजय आहेर व अधिसभा सदस्य दिनेश चव्हाण होते.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.३ (प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात बुधवार दि. ३ जुलै रोजी प्री पीएच.डी. कोर्स वर्क परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.

पीएच.डी. प्रवेश पुर्व परीक्षा (पेट) २०२३ मध्ये घेण्यात आली. या परीक्षेतील विद्यार्थ्यांची प्री.पीएच.डी. कोर्स वर्क परीक्षा बुधवारी झाली. या परीक्षेसाठी ७६८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा केंद्रात चार बॅचेसमध्ये ही परीक्षा झाली. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी , प्र- कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील यांनी परीक्षा केंद्राला भेट दिली. केंद्रप्रमुख प्रा. पी.पी. माहुलीकर यांनी काम पाहिले.

**बातमी क्र. ३**

जळगाव दि.३ (प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या वतीने घेण्यात आलेल्या परिसर मुलाखतीद्वारे रसायनशास्त्र प्रशाळेच्या एम.एस्सी. पेस्टीसाईडस अॅण्ड अॅग्रो केमिकल्स अभ्यासक्रमाच्या चार विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यासाठी निवड झाली.

सिन्जेंटा बायोसायन्स प्रा. लि. या कंपनीसाठी राहुल माळी व शुभांगी देसले या विद्यार्थ्यांची तर गुरगाव येथील इन्स्टिट्यूट ऑफ पेस्टीसाइड फॉर्म्युलेशन टेक्नॉलॉजी या कंपनीसाठी गौरी पाटील आणि टीएम इनपुटस अॅण्ड सर्व्हिसेस प्रा. लि., पुणे या कंपनीसाठी ललित पाटील अशा एकूण चार विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. रू. ३.६० ते ५ लाख या वार्षिक वेतनावर या विद्यार्थ्यांची ऑनलाईन मुलाखतीद्वारे निवड झाली. कक्षाचे उपसमन्वयक डॉ. उज्ज्वल पाटील, समन्वयक प्रा. रमेश सरदार, प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा, डॉ. अमरदिप पाटील, पेस्टीसाइड विभाग प्रमुख प्रा. रत्नमाला बेंद्रे यांनी मुलाखतींचे व्यवस्थापन केले. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्रशाळेचे संचालक प्रा.धनंजय मोरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ३ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी